संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
4 AUG 2018
प्राप्त झाले सही.........

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखाधिकारी (गट ब राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विनंती बदलीबाबत - सन २०१८

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन आदेश क्र.संलेको २०१८/प्र.क्र.११३/कोषा प्रशा-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ४.८.२०१८.

वाचा :- वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको २०१८/प्र.क्र.११३/कोषा प्रशा-२, दि.२०.७.२०१८

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांचे संदर्भिय आदेशान्वये विनंती बदलीचे आदेश निर्गमित करण्यांत आलेले आहेत. सदर आदेशातील अ.क्र.३८ वरील श्री.गोविंद अच्युतराव बोंदर, लेखाअधिकारी यांच्यापुरते सदर आदेश रदद करण्यांत येत आहेत.

२. तसेच, खालील विवरणपत्रात नमूद अधिकारी यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४) व (५) मधील तरतुदीनुसार विवरणपत्रात नमुद स्तंभ क्र. ५ मध्ये नमुद पदावर विनंतीने बदलीच्या पदस्थापनेत अंशत: बदल करण्यात येत आहे.

| क्र. | विनंती बदली आदेशातील अ.क्र. | नाव, पदनाम व सध्याचे कार्यालय | विनंती बदलीने पदस्थापना | सुधारीत पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | ४१ | श्रीमती प्रणिता प्रकाशराव झाडे, लेखा अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा | लेखा अधिकारी, जिल्हाधिकारी (अंलेप) कार्यालय, नागपूर | लेखाअधिकारी, पोलीस आयुक्तालय, नागपूर |

२. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने त्यांच्याकडील सध्याच्या पदाचा कार्यभार सोपवून तात्काळ कार्यमुक्त होऊन बदली झालेल्या पदावर/ठिकाणी हजर व्हावे. संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी बदली अधिकाऱ्यांची प्रतिक्षा न करता स्थानिक व्यवस्था करुन संबंधीत अधिकाऱ्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

३. वरील अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या ठिकाणी हजर होताच संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई आणि शासनास अवगत करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( माधवी गांधी )
अवर सचिव, वित्त विभाग

प्रत,

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
२) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*
३) महालेखापाल -१ /२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.*
४) प्रधान सचिव (ले व को) यांचे स्वीय्य सहायक, मंत्रालय, मुंबई.

desktop/Manjusha/बदली/विनंती बदली.doc